# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

### मराठी विभाग

सकाळ

# सर्वांत विश्वासार्ह स्रोत पुस्तक

## राजगुरुनगर येथे डॉ. संभाजी मलघे यांचे प्रतिपादन

**राजगुरुनगर, ता. १७ :** ज्ञानाचा सर्वांत विश्वासार्ह स्रोत पुस्तक असून, त्यासाठी वाचन आवश्यक असल्याचे प्रतिपादन तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संभाजी मलघे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळातर्फे वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. स्मितेश जोशी उपस्थित होते.




**राजगुरुनगर (ता. खेड) : राजगुरू महाविद्यालयाच्या वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. संभाजी मलघे.**

या निमित्ताने वाचनाध्यास व अभिवाचन उपक्रम राबविण्यात आला. निबंध स्पर्धा, काव्यवाचन, आवडत्या पुस्तकांचे अभिवाचन, वर्तमानपत्रांच्या अग्रलेखांचे वाचन, स्वरचित कवितांचे सादरीकरण, कथाकथन आदी अनेक साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात गौरी सुतार, श्रुती गारगोटे, मानसी रेटवडे, सिद्धेश्वरी जैद, रूपाली कोहिनकर, संचिता मोरे, प्राजक्ता मांजरे या विद्यार्थिनींनी विशेष प्रावीण्य प्राप्त केले. त्यांना पुस्तके भेट देण्यात आली. ग्रंथालय विभागातर्फे ग्रंथप्रदर्शन व रोजगार संदर्भ या जॉब पोर्टलचे उद्‌घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अनुसे यांनी केले. प्रा. एस. एस. उळागड्डे यांनी आभार मानले.

Pune, District-Today
18/10/2019 Page No. 5

# पुस्तक हे ज्ञानाचा विस्वासार्ह स्त्रोत : मलघे

- दावडी : ज्ञानाचा सर्वात विश्वासार्ह स्रोत पुस्तक आहे. वाचन हा ज्ञानप्राप्तीचा उत्तम मार्ग असल्याचे प्रतिपादन डॉ. संभाजी मलघे यांनी केले.
- हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. वाचन संस्कृतीची गरज हा त्यांचा विषय होता. उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बी.डी. अनुसे, प्रा.एम.एल. मुळूक, प्रा. स्मितेश जोशी आदी उपस्थित होते.
- डॉ. मलघे यांनी वाचनाचे फायदे विशद केले. वाचनामुळे बुद्धीला चालना मिळते, ताणतणाव दूर होतो, वैचारिक मनोरंजन होते, भाषेवर प्रभुत्व वाढते, शब्दसंपत्ती वाढते, बुद्धी आणि मन यांची बैठक तयार होते, असे त्यांनी सांगितले. मराठी विभागाच्यावतीने डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा




१५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला.
- वाचन पंधरवडा हा उपक्रम १ ते १५ ऑक्टोबरदरम्यान राबविण्यात आला. पंधरवड्यात निबंध स्पर्धा, काव्यवाचन, आवडत्या पुस्तकांचे अभिवाचन, वर्तमानपत्रांच्या अग्रलेखांचे वाचन, स्वरचित कवितांचे सादरीकरण, कथाकथन आदी साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.
- गौरी सुतार, श्रुती गारगोटे, मानसी रेटवडे, सिद्धेश्वरी जैद, रुपाली कोहिनकर, संचिता मोरे, प्राजक्ता मांजरे यांनी विशेष प्रावीण्य प्राप्त केले. त्यांना पुस्तके भेट देण्यात आली.
- ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथप्रदर्शन व रोजगार संदर्भ या जॉब पोर्टलचे उद्घाटन केले.

# वाचन हा ज्ञानाचा उत्तम मार्ग – डॉ. संभाजी मलघे

राजगुरुनगर : ज्ञानाचा सर्वात विश्वासार्ह स्रोत पुस्तक असून वाचन हा उत्तम मार्ग असल्याचे प्रतिपादन तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संभाजी मलघे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात  वाचन संस्कृतीची गरज या विषयावर बोलत होते. या प्रसंगी उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बी.डी.अनुसे, प्रा.एम.एल.मुळूक, प्रा. स्मितेश जोशी, उपस्थित होते.

डॉ. मलघे यांनी वाचनाचे फायदे विशद करताना सांगितले की, वाचनामुळे बुध्दीला चालना मिळते, ताणतणाव दूर होतो, वैचारिक मनोरंजन होते, भाषेवर प्रभुत्व वाढते, शब्दसंपत्ती वाढते तसेच बुध्दी आणि मन यांची बैठक तयार होण्याचे वाचन महत्त्वाचे साधन असते. सध्याचा काळ आव्हानात्मक, संघर्षाचा असून व्यक्तीला सन्मान मिळवायचा असेल तर वाचनसंस्कृती जोपासायला हवी, असे ते म्हणाले. वाचाल तर वाचाल, जेथे जेथे दिसे पुस्तक, तेथे तेथे व्हावे नतमस्तक, जेथे पुस्तकांचा साठा, तेथे समृध्दीला नाही तोटा, पुस्तकांशी करीता मैत्री, ज्ञानाची मिळते खात्री या सूत्रांचा विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात वापर करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.

मराठी विभागाच्या वतीने डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करताना १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान वाचन पंधरवडा अंतर्गत वाचनाध्यास व अभिवाचन उपक्रम राबविण्यात आला. या दरम्यान निबंध स्पर्धा, काव्यवाचन, आवडत्या पुस्तकांचे अभिवाचन, वर्तमानपत्रांच्या अग्रलेखांचे वाचन, स्वरचित कवितांचे सादरीकरण, कथाकथन आदि अनेक साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यात गौरी सुतार, श्रुती गारगोटे, मानसी रेटवडे, सिध्देश्वरी जैद, रूपाली कोहिनकर, संचिता मोरे, प्राजक्ता मांजरे या विद्यार्थिनींनी विशेष प्रावीण्य प्राप्त केले. त्यांना पुस्तके भेट देण्यात आली. ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथप्रदर्शन व रोजगार संदर्भ या जॉब पोर्टलचे उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे, सूत्रसंचालन डॉ. बी.डी.अनुसे, आभार प्रा. एस.एस.उळागड्डे यांनी मानले.

# जिल्ह्यात वाचन प्रेरणा दिनाला सामाजिक उपक्रमांची झालर

## डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन : शाळा, महाविद्यालयांत प्रतिसाद

### 'ज्ञानाचा सर्वात विश्वासार्ह स्रोत पुस्तक'

**राजगुरुनगर, दि. १५ (प्रतिनिधी)** - ज्ञानाचा सर्वात विश्वासार्ह स्रोत पुस्तक आहे, असे प्रतिपादन तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संभाजी मलघे यांनी केले. हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने वाचन प्रेरणा दिनानिमित्त कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. स्मितेश जोशी, उपस्थित होते.

निबंध स्पर्धा, काव्यवाचन, आवडत्या पुस्तकांचे अभिवाचन, अग्रलेखांचे वाचन, स्वरचित कवितांचे सादरीकरण, कथाकथन आदींचे आयोजन केले. यात गौरी सुतार, श्रुती गाडगोळे, मानसी रेठवडे, सिद्धेश्वरी जैद, रूपाली कोहिनकर, संचिता मोरे, प्राजक्ता मांजरे यांनी प्रावीण्य प्राप्त केले. त्यांना पुस्तके भेट दिली. यावेळी ग्रंथप्रदर्शन व रोजगार संदर्भ या जॉब पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनुसे यांनी केले. प्रा. एम. एस. ठळगडे यांनी आभार मानले.



राजगुरुनगर (ता. खेड) : येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मार्गदर्शन करताना मान्यवर.

### कुरणमध्ये वाचन प्रेरणा दिन

**नारायणगाव, दि. १५ (वार्ताहर)** - जयहिंद कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, कुरण आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवस विविध उपक्रमांनी राबविला आला. याप्रसंगी संस्थेच्या संचालिका शुभां गुंजाळ, संस्थेचे मुख्य कार्यका अधिकारी डी. एस. गल्हे, जि कॉलेज ऑफ इंजीनियरिंग प्राचार्य डॉ. डी. जे. गरकल, प्र आर. एल. मानकर, प्रा. सं ए. कोळसे, राष्ट्रीय सेवा योज कार्यक्रम अधिकारी आर. ए कजवे उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख